## डॉ.अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालय युवा दिन साजरा.

जळगांव - डॉ. अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालयातील मानसशास्त्र विभागातर्फे युवा दिनाच्या निमित्ताने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

प्रस्तुत व्याख्यानासाठी सरदार पटेल विद्यापीठातील मानसशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. समीर पटेल यांना व्याख्यानाचे प्रमुख वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले त्यांनी त्यांच्या व्याख्यानात "दैनंदिन जीवनातील मानसशास्त्राचे उपयोजन" या विषयावर उपस्थित विद्यार्थ्यांनींना बहुमोल मार्गदर्शन केले. सदर व्याख्यानाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एस.राणे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात स्वामी विवेकानंदांना आदरांजली अर्पण करुन "वैज्ञानिक दृष्टीकोनाचे महत्व" या विषयी उद्‌बोधन केले.

सदर व्याख्यानाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.पी.ए.बाविस्कर यांनी केले तर आभार प्रदर्शन कु. राजश्री जोशी हिने केले. या कार्यक्रमास मानसशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. बी.एस.पवार, प्रा. डॉ. आर. टी. पोतदार, प्रा. गौरी पवार, प्रा. शहनाज तडवी उपस्थित होते. या कार्यक्रमास मानसशास्त्र विभागातील विद्यार्थीनींचा भरघोस प्रतिसाद लाभला.

